**L. A. BILL No. XLVI OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६. २०२३ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ प्रख्यापित केला होता ;



एचबी २३०८—१

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात त्यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये,– २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (छ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :–

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागण्याकरिता अर्ज करण्याचे, अधिष्ठाता मंडळाद्वारे अर्जाची छाननी करण्याचे व ते राज्य शासनाकडे पाठविण्याचे आणि राज्य शासनाकडून इरादापत्र देण्याचे दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) यामध्ये निर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

**तक्ता**

| खंड<br>(१) | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक<br>(२) | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक<br>(३) |
|---|---|---|
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (ग) | ज्या वर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | ३१ डिसेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (घ) | विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | १५ फेब्रुवारी २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(२) पोट-कलम (४) मधील, खंड (घ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता राज्य शासनाकडे अर्ज करण्याचा दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला दिवस हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

**तक्ता**

| खंड<br>(१) | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस<br>(२) | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक<br>(३) |
|---|---|---|
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी.". |

**३.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची क मधील भाग एक मध्ये, अनुक्रमांक ४ येथील नोंदीमध्ये,– सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यास जोडलेल्या अनुसूची क ची सुधारणा.

(१) स्तंभ (१) मधील, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मधील,–

(एक) नोंद (१) मधील, "औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) नोंद (४) मधील, "उस्मानाबाद" या मजकुराऐवजी, "धाराशिव" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०२३ चा महा. अध्या. ८.

**४.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६. ]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.